## कोतवाल भरती प्रक्रिया 2023

## तहसिलदार कार्यालय कणकवली, वैभववाडी व देवगड यांचे आस्थापनेवरील कोतवाल भरतीसाठी जाहिरनामा

1. महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.पीकेए 1059/VI-L दि. 07.05.1959
2. महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.कोपआ 3705/प्र.क्र.106/ई-10 दि. 23.01.2008
3. महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.केओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दि. 05.09.2013
4. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2021/प्र.क्र.387/16-ब(ए) दि. 06.07.2021
5. महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-2022/प्र.क्र.191/ई-10 दि. 06.04.2023
6. महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि. 17.05.2023
7. महसुल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दि. 17.05.2023
8. मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र.कुवशा-कावि356/07/2023 दि. 05.07.2023

........................................................................................................................................

सर्व नागरीकांना याव्दारे जाहिर करणेत येते की, उपरोक्त शासन निर्णयातील व शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांच्या व तरतुदींचे अनुषंगाने तहसिलदार कणकवली / वैभववाडी / देवगड यांचे आस्थापनेवरील खालील तलाठी सजामधील कोतवालांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडुन या जाहिरनाम्याव्दारे दि. 25 ऑगस्ट 2023 रोजी सायंकाळी 06.15 वाजेपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. तहसिलदार कार्यालय कणकवली / वैभववाडी / देवगड या तालुक्यातील रिक्त कोतवाल पदे भरणेसाठीचा अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

### तहसिलदार कार्यालय कणकवली

| पदाचे नाव व मानधन | एकुण भरावयाची कोतवालांची पदे | अ. क्र. | सजाचे नाव | प्रवर्ग | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| कोतवाल, दरमहा मानधन रक्कम रु 15000/- | अज - 1,<br>भज क - 1,<br>भज ड - 1,<br>इमाव - 3,<br>**एकुण - 6** | 1 | घोणसरी | अनुसुचित जमाती | - | 1 |
| | | 2 | कलमठ | भटक्या जमाती क | - | 1 |
| | | 3 | वरवडे | भटक्या जमाती ड (महिला) | 1 | - |
| | | 4 | नांदगाव | इतर मागास वर्ग | - | 1 |
| | | 5 | लोरे | इतर मागास वर्ग | - | 1 |
| | | 6 | दिगवळे | इतर मागास वर्ग (महिला) | 1 | - |
| **एकुण** | | | | | **2** | **4** |

### तहसिलदार कार्यालय वैभववाडी

| पदाचे नाव व मानधन | एकुण भरावयाची कोतवालांची पदे | अ. क्र. | सजाचे नाव | प्रवर्ग | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| कोतवाल, दरमहा मानधन रक्कम रु 15000/- | विजा अ - 1,<br>भज ड - 1,<br>इमाव - 1,<br>इडब्लुएस - 1<br>**एकुण - 4** | 1 | तिरवडे तर्फ सौंदळ | विमुक्त जाती अ | - | 1 |
| | | 2 | कुसुर | भटक्या जमाती ड | - | 1 |
| | | 3 | भुईबावडा | इतर मागास वर्ग | - | 1 |
| | | 4 | आचिर्णे | इडब्लुएस (महिला) | 1 | - |
| | **एकुण** | | | | **1** | **3** |

**तहसिलदार कार्यालय देवगड**

| पदाचे नाव व मानधन | एकुण भरावयाची कोतवालांची पदे | अ. क्र. | सजाचे नाव | प्रवर्ग | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|
| कोतवाल, दरमहा मानधन रक्कम रु 15000/- | अज - **1**, इडब्लुएस - 1 अराखीव - 2 **एकुण - 4** | 1 | गवाणे | अनुसुचित जमाती | - | 1 |
| | | 2 | वळीवंडे | इडब्लुएस | - | 1 |
| | | 3 | कुवळे | अराखीव | - | 1 |
| | | 4 | उंडील | अराखीव (महिला) | 1 | - |
| **एकुण** | | | | | **1** | **3** |

वरील प्रमाणे रिक्त सजातील कोतवाल भरती करणेची असुन इच्छुक उमेदवारांकडुन अध्यक्ष, कोतवाल भरती निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी कणकवली यांचेमार्फत हा जाहिरनामा प्रसिध्द झालेपासुन **दि. 25 ऑगस्ट 2023 रोजी सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत** (शासकिय सुट्टी वगळुन कार्यालयीन वेळेत) अर्ज मागविणेत येत आहेत. सदर तारखेनंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. याबाबत **दि. 25 ऑगस्ट 2023** पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी **दि. 29 ऑगस्ट 2023** रोजी संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. पात्र उमेदवारांचे लेखी परिक्षेचे ठिकाण उमेदवाराचे प्रवेशपत्रावर नमुद असेल तसेच या जाहिरनाम्याच्या प्रसिध्दीपुर्वी केलेल्या कोणत्याही अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रस्ताविकेतील अ.क्र. 1 ते 8 नुसार कोतवालांच्या नेमणुका व नोकरीबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असुन उमेदवारांना बंधनकारक राहतील.

<u>**कोतवाल पदासाठी इच्छुक उमेदवार हे खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीस पात्र असणे आवश्यक आहेत.**</u>

1. शैक्षणिक पात्रता किमान 4 थी उत्तीर्ण
2. अर्जदाराचे वय जाहिरनाम्याच्या दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी व 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. पुराव्यादाखल जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे. याव्यतिरीक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही. संबंधित पुरावा स्वसांक्षांकित असावा. तसेच स्वयंघोषणापत्र संलग्न करावे.
3. अर्जदार हा शारीरीकदृष्टया व कोतवाल पदाची कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असला पाहिजे. नियुक्तीनंतर सहा महिन्यात जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेची जबाबदारी उमेदवाराची राहील. सदर प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करणेत येईल.
4. अर्जदार ज्या सजासाठी अर्ज करीत आहे तो त्याच तालुक्याचा स्थानिक रहीवासी असावा व तालुक्याची अर्जदारास माहिती असणे आवयश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक रहिवासी असल्याबाबतचे तहसिलदार यांचा स्थानिक वास्तव्याचा/रहीवाशी दाखला जोडणे आवश्यक आहे. याव्यतिरीक्त इतर कुठलेही पुरावे ग्राहय धरले जाणार नाहीत. सदर पुरावा स्वस्वाक्षांकित असावा.
5. अर्जदार यांना विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तहसिलदार कार्यालयातुन उपलब्ध करुन घेता येईल. अर्जदार ज्या तालुक्याचा स्थानिक रहीवाशी आहे त्याच तालुक्यातील रिक्त कोतवाल पदासाठी अर्ज करता येईल. तसेच सदर अर्ज हा त्याच तहसिलदार कार्यालयात स्वत: उपस्थित राहुन सादर करावा. पोस्टाव्दारे अथवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम उदा. इमेल इ. व्दारे आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्याचप्रमाणे तहसिलदार कार्यालयाकडुन उपलब्ध करुन दिलेले विहीत नमुन्यातील मुळ अर्जच स्वीकारले जातील. अर्जाची झेरॉक्स स्वीकारली जाणार नाही.
6. राखीव प्रवर्गासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने सक्षम प्राधिका-याचे जातीचे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2023-24 या आर्थिक वर्षातील नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्र अर्जासोबत न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविणेत येईल. तसेच उमेदवाराची नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन 6 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे

बंधनकारक राहील. विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता, कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द/समाप्त करणेत येईल.

7. महिला समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता महिला व बाल विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि. 04.05.2023 चे शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करणेत आली असुन सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. 4 नुसार अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

8. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील सर्व स्त्री/पुरुष उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरीता लागु असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

9. सामान्य प्रशासन विभाग, महिला व बाल विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील निर्णय दि. 16/04/1981, 27/10/2009, 19/09/2013, 01/07/2016, 21/01/1980, 27/08/2009, 04/11/2016, 02/05/1998, 28/07/2014 व 02/04/2018 अन्वये समांतर आरक्षण हे वर्ग अ ते ड या गटातील पदांसाठी लागु असलेने व महसुल व वन विभागातील कोतवाल हे पद अवर्गीकृत असलेने समांतर आरक्षण लागु होत नाही. सबब अपंग प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडु, माजी सैनिक इ. साठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथिलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागु असणार नाही.

10. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच नियुक्तीनंतर एक महिन्यात संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्यपडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

11. अर्ज पुर्ण माहितीसह व अचुक भरावा. ज्या तलाठी सजासाठी अर्ज केला आहे त्या तलाठी सजाचे नाव, प्रवर्ग भरणे अत्यावश्यक आहे. अर्जदारास एकाच सजासाठी अर्ज सादर करता येईल. एकापेक्षा जास्त सजांसाठी अर्ज सादर केल्यास प्रथम प्राप्त अर्जाचाच विचार करणेत येईल. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी/चुकीची/दिशाभुल करणारी आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल व गुणवत्तेनुसार पुढील उमेदवारास संधी देणेत येईल.

12. अर्जदार व्यक्तीस वर नमुद केलेल्या पात्रतेसह लेखी परिक्षेत गुणवत्ता प्राप्त करावी लागेल. लेखी परिक्षेच्या गुणांचे आधारे सजानिहाय गुणानुक्रमे निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

13. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

14. अपुर्ण माहितीचे, विहीत नमुन्यात व कालावधीत प्राप्त न झालेले, विहीत शुल्क भरणा न केलेले, शैक्षणिक अर्हता न धारण केलेले, वयाची अट पुर्तता न केलेले, फोटो नसलेले, मुदतबाहय प्राप्त अर्ज रद्द करण्यात येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

15. ज्या उमेदवारांचे अर्ज पात्र ठरतील अशा उमेदवारांची नावे व परिक्षेचे ठिकाण संबंधित तहसिलदार कार्यालय कणकवली, वैभववाडी व देवगड येथील नोटीसबोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. परिक्षेसाठीचे प्रवेशपत्र संबंधित तहसिल कार्यालयाकडुन वेळेत प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी पुर्णत: उमेदवाराची राहील. पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा रविवार दि. 10/09/2023 रोजी सकाळी 11 ते 12 या वेळेत उमेदवाराचे प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या ठिकाणी घेण्यात येईल. लेखी परिक्षेस उमेदवाराने परिक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास अगोदर परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच लेखी परिक्षेकरीता स्वखर्चाने उपस्थित राहणेची जबाबदारी उमेदवाराची राहील.

16. नियुक्तीचे वेळी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे मुळ प्रती सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.
17. कोतवाल पदाच्या अर्जाचे शुल्क रु 25/- रोखीने भरुन अर्ज प्राप्त करुन घेता येईल. परिक्षा शुल्क मागासवर्गीय उमेदवारांकरीता रु 200 व इतर उमेदवारांकरीता रु. 300/- इतके असेल. सदर परिक्षा शुल्क नापरतावा आहे.
18. कागदपत्रांसहीत अर्ज सादर करताना अर्जावर रक्कम रु 5/- कोर्ट फी स्टॅम्प चिकटविणे व परिक्षा शुल्क रोखीने भरणे आवश्यक आहे. धनादेश, डीमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत.

**<u>सेवाशर्ती</u>**

1. कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील. तसेच त्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय नाहीत.
2. कोतवालांची नेमणुक ही पुर्णत: मानधन तत्वावर असुन सदर नेमणुक ही पुर्णत: अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपाची राहील.
3. कोतवाल हा पुर्ण वेळ शासनाचा सेवक असेल.

**<u>अर्जदाराने अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्र</u>**

1. शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याची सत्यप्रत उदा. किमान 4 थी पास गुणपत्रक/प्रमाणपत्र किंवा त्यावरील परिक्षा पास गुणपत्रक/प्रमाणपत्र प्रत
2. उपरोक्त अटी व शर्तीमधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेप्रमाणे वयाच्या पुराव्याची सत्यप्रत
3. उपरोक्त अटी व शर्तीमधील अ.क्र. 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे उमेदवार संबंधित तालुक्याचा रहिवासी असल्याबाबतच्या पुराव्याची सत्यप्रत
4. राखीव प्रवर्गाकरीता जात प्रमाणपत्र, लागु असल्यास नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत
5. उमेदवाराचा अर्जासोबत अलिकडचे काळातील काढणेत आलेला पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत फोटो पैकी एक फोटो अर्जावर योग्य ठिकाणी चिकटवुन त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी.
6. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
7. विवाहीत महिला उमेदवार असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र / नाव बदलाबाबतचे गॅझेट प्रत
8. चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराचे नावात कोणताही बदल झाला असल्यास त्याबाबत शासन राजपत्राची प्रत
9. परिक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत

**<u>अर्ज वितरणाचे ठिकाण</u>**

कोतवाल पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना **दि. 14/08/2023** पासुन **दि. 25/08/2023** पर्यंत शासकिय सुट्टी वगळुन कार्यालयीन कामाकाजाचे वेळेत संबंधित तहसिलदार कार्यालयामधुन अर्ज शुल्क रु 25/- भरणा करुन प्राप्त करुन घेता येईल. तसेच परिपुर्ण कागदपत्रासहीत अर्ज **दि. 25/08/2023** रोजी सायंकाळी 6.15 वाजेपर्यंतच स्वीकारले जातील.

**<u>कामकाजाचे स्वरुप</u>**

1. तलाठी सजा व कार्यालयीन आवारातील स्वच्छता, साफसफाई करणे
2. तलाठी सजाशी संबंधित सर्व कामाकाजात तलाठी यांना सहाय्य करणे
3. कार्यालयीन दप्तर वाहुन नेणे
4. कार्यालयीन टपालाची ने-आण करणे, नोटीस बजावणे, दवंडी पिटवणे
5. सरकारी मालमत्तेचे संरक्षण करणे
6. कोतवाल भरती व नेमणुक नियम 1959 मध्ये नमुद केलेली सर्व कामे
7. याव्यतिरीक्त वेळोवळी वरीष्ठ अधिका-यांनी सोपविलेली इतर सर्व कामे पार पाडावी लागतील.

**परिक्षेचे स्वरुप**

1. कोतवाल पदासाठी घेण्यात येणारी लेखी परिक्षा ही वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे 50 प्रश्न व 100 गुणांची सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, मराठी, गणित, विज्ञान, इतिहास व नागरीकशास्त्र, सिंधुदुर्ग जिल्हा माहिती यावर आधारीत प्रश्नांची राहील व परिक्षेचे माध्यम मराठी राहील.
2. लेखी परिक्षा ही **रविवार दि. 10/09/2023 रोजी सकाळी 11 ते दु. 12** या वेळेत उमेदवाराचे प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या केंद्रावर घेण्यात येईल.
3. परिक्षेस येताना परिक्षा कक्षामध्ये सोबत परिक्षा प्रवेशपत्र व स्वत:चे फोटो ओळखपत्र (आधार, पॅन, ड्रायव्हींग लायसन्स, निवडणुक ओळखपत्र यापैकी एक) ठेवणे बंधनकारक आहे.
4. कोणत्याही कारणास्तव परिक्षा स्थगित ठेवावी लागल्यास पुढील परिक्षेची वेळ, ठिकाण व दिनांक उमेदवारास त्याने अर्जात नमुद केलेल्या मोबाईल क्र. ई मेलव्दारे कळविणेत येईल. तशा सुचना संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येतील. अशा वेळी प्रथम परिक्षेचे प्रवेशपत्र ग्राहय धरण्यात येईल.
5. परिक्षेला परिक्षा कक्षामध्ये कोणतेही पुस्तकी साहीत्य, कॅलक्युलेटर, मोबाईल, स्मार्ट वॉच, इअर फोन इ. इलेक्ट्रॉनिक गॅझेट सोबत बाळगता येणार नाही. असे साहीत्य आढळुन आल्यास संबंधित उमेदवारास तात्काळ भरती प्रक्रियेपासुन अपात्र ठरविणेत येईल.

**OMR शीट (उत्तरपत्रिके) बाबत सुचना -**

1. उत्तरपत्रिका काळजीपुर्वक हाताळावी, ती चुरगळणार नाही, फाटणार नाही, खराब होणार नाही, त्यावर कोणतीही खाडाखोड होणार नाही याची उमेदवाराने दक्षता घ्यावी.
2. लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेची OMR शीट प्रमाणे तपासणी होणार असल्याने उत्तरे लिहीण्यासाठी अथवा योग्य पर्यायावर भरीव वर्तुळाने चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईचे बॉल पेन वापरावे.
3. उत्तरपत्रिकेच्या OMR शीटवर विहीत ठिकाणी परिक्षेचे नाव, प्रश्नपत्रिका संच क्रमांक, बैठक क्रमांक, प्रश्नपत्रिका क्रमांक योग्य ठिकाणी व अचुकपणे नमुद करुन विहीत ठिकाणी स्वाक्षरी करावी.

**सामाजिक आरक्षण**

1. रिक्त पदांची संख्या, आरक्षण, अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी विहीत केलेले आरक्षण नियमानुसार अनुज्ञेय असेल.
2. महिलांसाठी 30% प्रमाणे आरक्षित पदे महिला व बालविकास विभाग यांचेकडील दि. 25.05.2001 च्या शासन निर्णयानुसार भरण्यात येतील. तथापी एखादया प्रवर्गात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येतील.
3. वि.जा.(अ.), भ.ज. (ब.), भ.ज.(क.) व भ.ज.(ड.) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारे करणेत येईल.
4. इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.
5. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. 12.02.2019 व दि. 31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**कोतवाल भरतीबाबत वेळापत्रक**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | दिनांक व वार | ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | वर्तमानपत्र जाहिरात / जाहिरनामा प्रसिध्द करणे | सोमवार दि.14/08/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 2 | अर्ज विक्री व स्विकारणे (कार्यालयीन दिवशी व सावर्जनिक | सोमवार दि.14/08/2023 ते शुक्रवार दि. 25/08/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |

| | | | |
|---|---|---|---|
| | सुट्टी वगळुन स. 10.00 ते सायं. 6.15 या वेळेत) | | |
| 3 | अर्जाची छाननी करुन परिक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | मंगळवार दि. 29/08/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 4 | परिक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घेणे | सोमवार दि.04/09/2023 ते मंगळवार दि. 05/09/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |
| 5 | लेखी परिक्षा<br>परिक्षा ठिकाण प्रवेशपत्रावर नमुद करणेत येईल. | रविवार दि.10/09/2023<br>स. 11 ते दु. 12<br>वेळ 1 तास | - |
| 6 | सजानिहाय व गुणवत्तानिहाय लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांची सजानिहाय यादी तयार करुन अंतिम निवड यादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करणे | सोमवार दि.11/09/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 7 | निवड झालेल्या उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची तपासणी | बुधवार दि.13/09/2023 ते गुरुवार दि.14/09/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |
| 8 | नियुक्ती आदेश निर्गमित करणे | शुक्रवार दि.15/09/2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |

**सर्वसाधारण सुचना**

1. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.
2. रिक्त पदांचे संख्येत वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.
3. सदर जाहिरात व जाहिरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवडप्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी व कणकवली यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.
4. भरती प्रक्रीयेबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी कणकवली यांचेकडे राखुन ठेवणेत आलेले आहेत.

s/- 14/8/23

**अध्यक्ष, कोतवाल निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी कणकवली**

क्र.आस्था/कोत. भ जा./08/2023
उपविभागीय अधिकारी कार्यालय कणकवली
दि. 14/08/2023

प्रत - 1. मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग (कुळवहीवाट शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

2. सदस्य सचिव कोतवाल निवड समिती तथा तहसिलदार देवगड/वैभववाडी/कणकवली यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तसेच नोटीसबोर्डावर प्रसिध्दीसाठी व रिक्त असलेल्या कोतवाल पदाचे तलाठी सजा, ग्रामपंचायतचे ठिकाणी व संबंधित गावात पुरेशी प्रसिध्दी देणेसाठी जाहिरनामा प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेसाठी रवाना

s/- 14/8/23

**अध्यक्ष, कोतवाल निवड समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी कणकवली**

# कोतवाल भरती 2023
## कोतवाल पदासाठी अर्जाचा नमुना

**अर्ज क्र.**

| केवळ कार्यालयीन वापरासाठी | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |
| अर्ज प्राप्त दिनांक | |
| अर्ज केलेल्या जातीचा प्रवर्ग | |
| अर्ज केलेल्या सजा व तालुक्याचे नाव | |

उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा रंगीत स्वसाक्षांकित फोटो

प्रति

मा. सदस्य सचिव तथा तहसिलदार..........................

विषय - कोतवाल पदासाठी अर्ज

संदर्भ - जाहिरातीचा क्रमांक.........................................................दि.

उपरोक्त संदर्भिय प्रसिध्द जाहीरनाम्याप्रमाणे मी ................................ तालुक्यातील ................................सजाचे कोतवाल पदासाठी अर्ज करत असुन जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली वैयक्तिक माहिती खालीतप्रमाणे सादर करीत आहे.

तालुक्याचे नाव -...............................................

ज्या तलाठी सजासाठी अर्ज करीत आहे त्या तलाठी सजाचे नाव -.........................................

1. आडनाव पहिले नाव वडीलांचे/पतीचे नाव

मराठी ...............................................................................................................................

इंग्रजी ...............................................................................................................................
(Capital Letters)

2. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह)

मराठीत ...............................................................................................................................

...............................................................................................................................

3. दुरध्वनी क्रमांक - ..................................................

4. मोबाईल क्रमांक - .................................................

5. इमेल आयडी - ....................................................................................

6. लिंग पुरुष/स्त्री - .....................................................

7. अर्जदाराची जन्मतारीख - दिनांक ......................महिना..............................वर्ष....................

8. जाहिरनाम्याचा दिनांक 14/08/2023 रोजी पुर्ण होणारे वय ..........वर्ष ..........महिने.........दिवस

9. वैवाहीक स्थिती - विवाहीत / अविवाहीत .................................

10. ज्या प्रवर्गातुन अर्ज सादर करीत आहे तो प्रवर्ग नमुद करणे आवश्यक आहे.
प्रवर्गाचे नाव ..........................................
(खालील चौकोनात / कंसात ✓ अशी खुण करावी) सोबत सक्षम प्राधिकारी यांचेकडुन घेतलेल्या जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचा नॉन क्रिमीलेअर दाखला अजा. व अज. वगळुन अन्य मागास संवर्गाचे उमेदवारांनी (त्या प्रवर्गातील महिलांसह ) सादर करणे आवश्यक आहे.

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला अराखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

11. महिलांचे आरक्षणातुन अर्ज सादर केला आहे / नाही - ..............................

12. शैक्षणिक अर्हता (प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे)

| अर्जदाराची शैक्षणिक व अन्य अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षांचा तपशील) | शाळा / तांत्रिक विदयालय विदयापीठ परिक्षा मंडळाचे नाव (शाखा व विषय नमुद करावेत) | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रमाणपत्राचा क्र., दिनांक व मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ)किमान शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |
| ब)अतिरीक्त उच्चतम शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |

13. परिक्षा शुल्क (मागासवर्गीयांसाठी रक्कम रु 200/- व इतरांसाठी रक्कम रु 300/- )
रक्कम रु .......................
परिक्षा शुल्क रोख भरणा केलेल्या पावतीचा क्रमांक...................................

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | कागदपत्रे | सोबत जोडले आहे/नाही |
|---|---|---|
| 1 | वयाचा पुरावा - जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला प्रत | |
| 2 | स्थानिक रहिवासी असल्याबाबतचा पुरावा - तहसिलदार यांचा वास्तव्याचा/रहिवासी दाखला | |
| 3 | शैक्षणिक पात्रतेचा पुरावा किमान 4 थी पास गुणपत्रक/प्रमाणपत्र त्यावरील परिक्षा पास गुणपत्रक/प्रमाणपत्र | |
| 4 | जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) / EWS प्रमाणपत्र (लागु असल्यास) | |
| 5 | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागु असल्यास) | |
| 6 | अर्जदाराचा फोटो, एक अर्जावर चिकटविणे व एक अर्जासोबत | |
| 7 | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना अ | |
| 8 | परिक्षा शुल्क भरणा केलेले पावतीची प्रत | |
| 9 | आधारकार्ड / पॅनकार्ड / ड्रायव्हींग लायसन्स / निवडणुक ओळखपत्र प्रत | |
| 10 | स्वयंघोषणापत्र | |

दिनांक -

ठिकाण -

(उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)

## स्वयंघोषणापत्र

मी श्री./श्रीमती ........................................................................ श्री ..............................................................................

यांचा मुलगा/मुलगी/पत्नी असे प्रमाणित करतो / करते की, तहलिसदार .................................. यांचे आस्थापनेवरील कोतवाल पद भरती 2023 ची जाहिरात/जाहीरनामा मी काळजीपुर्वक वाचला/वाचली असुन सदर जाहिरनाम्यातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असुन त्याचे पृष्टर्थ प्रमाणपत्रांचे साक्षांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत. वर नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळुन आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच मला कोणत्याही गुन्हयात कोणताही दंड अगर शिक्षा झालेली नाही. कोतवाल पदावर माझी नियुक्ती झाल्यास याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मी नियुक्तीनंतर एक महिन्याचे आत सादर करणेची हमी देत आहे.

दिनांक -

ठिकाण - (उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

नमुना - अ

( नियम 4 पहा )

मी श्री./श्रीमती.......................................................................................श्री.................................................................................

यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय वर्ष.................रा.............................................................................................याव्दारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो/करते की

(1) मी कोतवाल पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

(2) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दि. 28/03/2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ......................असुन त्यांचे जन्म दिनांक .......................................................................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. 28/03/2005 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे

ठिकाण - ...............................

दिनांक - ...............................

अर्जदाराचे नाव व सही